**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. १३ दिनांक २०/०३/२०२४**

# मोखाडा पोलीस ठाणे येथे दाखल खूनाच्या गुन्ह्यात कोणतेही धागेदोरे नसताना उकल करण्यात पालघर पोलीसांना यश.

दि.०७/०२/२०२४ रोजी १०.२० वाजता चे पुर्वी नक्की वेळ माहित नाही मोखाडा पोलीस ठाणे हद्दीतील कारेगांव चे शिवारात खोडाळा ते कसारा जाणारे रोडवरील वैतरणा नदीवरील पुलाखाली अनोळखी स्त्री वय ३० ते ३५ वर्षे हीस अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन तीचे मुंडके कोणत्यातरी धारधार शस्त्राने धडा वेगळे करुन ते पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने पुलावरुन खाली टाकुन जिवे ठार मारले म्हणुन मोखाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.I २२/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांनी श्री.गणपत पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा पालघर व श्री. प्रदिप गिते, प्रभारी अधिकारी, मोखाडा पोलीस ठाणे यांना वेगवेगळी तपास पथके तयार करून तपासाबाबत मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्या अनुषंगाने पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई व पोउपनि/रविंद्र वानखेडे यांचे पोलीस पथक तयार केले. सदर पथकाने मयत महिलेची ओळख पटविण्यासाठी नंदुरबार, जळगाव, धुळे, नाशिक, ठाणे, कल्याण, मुंबई तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील पोलीस ठाणे यांचेशी संपर्क केला. परंतु मयत महिलेची कोणतीही माहिती प्राप्त झाली नव्हती.

मयत महिला हिचे उजव्या हातावर ममता असे नाव गोंदलेले होते तसेच पायामध्ये चांदीचे जोडवे त्यावर SDS असा मार्क होता. मयत महिलेल्या पायातील जोडव्याआधारे माहिती प्राप्त केली असता सदरचे जोडवे हे शिरपुर जिल्हा धुळे येथील SDS (सुधाकर दिपचंद सोनार) दिक्षा ज्वेलर्स चे मालक यांचेकडे तयार केल्याचे व ते पावरा समाजाचे महिला वापरत असल्याचे निष्पन्न झाल्याने शिरपुर तालुक्यातील मतदार यादी तपासली असता सुमारे ४४५ ममता नाव असलेल्या महिला यांची यादी संकलीत केली. शिरपुर तालुक्यातील सर्व पोलीस पाटील यांची बैठका घेतल्या सदर बैठकामध्ये त्यांना गुन्हयातील हकिकत सांगीतली व त्या भागातील पोलीस पाटील यांचे वॉटसअ‍ॅप ग्रुप तयार केले व त्यावर गुन्हयाची शोध पत्रीका पाठवुन त्यादवारे माहिती घेतली असता मयत ही मौजे लाकडे हनुमान ता. शिरपुर, जिल्हा धुळे येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने अधिक माहिती प्राप्त केली असता यातील मयत व आरोपी सुनिल उर्फ गोविंद यादव यांचेत प्रेमसंबंध असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार तांत्रिक व गोपणीय माहितीच्या आधारे आरोपी क्र. ०१ सुनिल उर्फ गोविंद यादव वय ४५ वर्षे रा. सोलापुर मुळ रा. खेंचा ता. जि. महाराजगंज राज्य उत्तरप्रदेश यास सोलापुर येथुन व आरोपी क्र. २ महेश रविंद्र बडगुजर उर्फ विक्की वय ३१ वर्षे रा. बोराडी ता. शिरपुर जिल्हा धुळे यास त्याचे राहते ठिकाणावरुन ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीत यांचेकडे कसून चौकशी केली असता सदर मयत महिला आरोपी क्र. १ यास लग्न करण्यास व प्रॉपर्टी नावावर करुन देण्यास बळजबरी करत होती. त्यावरुन त्यांचेत वाद होऊन आरोपीत क्र. १ याने आरोपी क्रमांक २ याचेशी संगनमत करुन मयत हिस लोणावळा येथे फिरावयास जायचे आहे असे सांगुन तिस सोबत घेऊन इर्टिगा गाडीने पालघर जिल्ह्यातील मौजे कारेगावचे हद्दित आणुन तिचा रुमालाने गळा आवळून जिवे ठार मारुन तिचा खून करुन तिचे मुंडके धडावेगळे करुन पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने वैतरणा नदीवरील पुलाखाली आणून टाकल्याचे आरोपीने कबुल केले आहे.

सदर दोन्ही आरोपी यास ताब्यात घेण्यात आलेले असून गुन्ह्याचा अधिक तपास हा श्री.गणपत पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.गणपत पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा पालघर श्री. प्रदिप गिते, प्रभारी अधिकारी, मोखाडा पोलीस ठाणे, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, पोउपनि/रवींद्र वानखेडे, पोहवा/राकेश पाटील, पोहवा/१२४० कपिल नेमाडे, पोहवा/२८९ संजय धांगडा, पोहवा/८१५ कैलास पाटील, पोहवा/८८८ दिनेश गायकवाड, पोहवा/६२० नरेंद्र पाटील, सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर तसेच पोहवा/विशाल पाटील, पोशि/वाल्मीक पाटील, पोशि/रोहित तोरस्कर नेमणुक सायबर पोलीस ठाणे, पालघर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.